28 JUL 2026

सकाळ

# अणुशास्त्रज्ञ शिवराम भोजेंचा वारसा जपा

## कुलगुरू डॉ. कामत : कसबा सांगावमध्ये कार्यक्रम

कसबा सांगाव, ता. २७ : 'कसबा सांगावचे सुपुत्र, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शिवराम भोजे यांनी ग्रामीण भागातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत अणुऊर्जा क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या देशसेवेचा वारसा सांगाव व परिसरातील विद्यार्थी आणि युवकांनी पुढे न्यावा,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

कसबा सांगाव येथील धावक्किर्ती सभागृहात 'आम्ही सांगावकर-एक अभियान'तर्फे आयोजित पारितोषिक वितरण व सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी निवृत्त अपर पोलिस आयुक्त आनंदराव कदम होते. विविध शाळांतील गुणवंत विद्यार्थी, तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार केला.

ज्येष्ठ युरोसर्जन डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी बौद्धिक विकासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सांगाव परिसरातील विद्यार्थी व युवकांच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार असल्याचे सांगितले. प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करून आयआयटी चेन्नईमध्ये प्रवेश मिळवलेल्या आरती पाटील हिचा विशेष सत्कार केला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींनाही गौरवले. विद्या शिवराम भोजे, मुग्धा देशपांडे, डॉ. कुबेर मगदूम, डॉ. श्याम पोतदार, भाऊसाहेब गंगाई, प्रल्हाद मेटे आदी उपस्थित होते.



कसबा सांगाव : येथे अर्णव पाटील याचा सत्कार करताना डॉ. आर. के. कामत. शेजारी आनंदराव कदम, सुनील स्वामी आदी.

राष्ट्रीय विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

28 JUL 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंतराव दत्तवाडे म्हणजे पत्रकारितेच्या मूल्यांचा दीपस्तंभ

## समाजहित, नैतिकता आणि नवोदित पत्रकार घडविण्याचा त्यांचा वारसा प्रेरणादायी

### ज्येष्ठ विचारवंत प्रसाद कुलकर्णी

■ कोल्हापूर, ता. २७ (प्रतिनिधी) –

चार दशकांहून अधिक काळ समाजहिताला केंद्रस्थानी ठेवत मूल्यनिष्ठ पत्रकारितेचा आदर्श निर्माण करणारे दैनिक महासत्ताचे स्वर्गीय संपादक वसंतराव दत्तवाडे हे केवळ संपादक नव्हते, तर समाजमन घडविणारे विचारवंत होते. पत्रकारितेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवत त्यांनी अनेक पिढ्यांतील पत्रकारांना घडविले. त्यांच्या पत्रकारितेवर सखोल संशोधन होऊन त्यांचे कार्य भावी पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रसाद कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने स्वर्गीय संपादक वसंतराव दत्तवाडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सोमवारी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय संपादक वसंतराव दत्तवाडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रसाद कुलकर्णी म्हणाले, मर्यादित भांडवल, साधनसामग्री आणि कार्यक्षेत्र असूनही वसंतराव दत्तवाडे यांनी दैनिक महासत्ताला समाजाभिमुख पत्रकारितेचे प्रभावी व्यासपीठ बनविले. इचलकरंजीसारख्या औद्योगिक शहरात दैनिक सुरू करणे ही मोठी जोखीम होती; मात्र त्यांनी ती स्वीकारत वृत्तपत्राला केवळ व्यवसाय न मानता समाजजागृतीचे साधन बनविले. परिसरातील सामाजिक, औद्योगिक, सहकारी आणि सांस्कृतिक चळवळींना दिशा देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले.

अनेक नवोदित पत्रकारांच्या आयुष्याला दिशा देण्याचे कार्यही त्यांनी केले. नव्या लेखकांमधील क्षमता ओळखून त्यांना संधी दिली, संपादकीय संस्कार घडविले आणि जबाबदारीची जाणीव करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक पत्रकार पुढे राज्यातील नामांकित वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमांमध्ये संपादक व वरिष्ठ पदांवर पोहोचले. लेखकांना सातत्याने लिहिते ठेवण्याची आणि समाजातील विविध विषयांवर अभ्यासपूर्ण लेखनाला प्रोत्साहन देण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी होती. इचलकरंजी आणि परिसरातील सामाजिक सलोखा, औद्योगिक समन्वय, सहकार चळवळ आणि सांस्कृतिक समृद्धी टिकविण्यात दत्तवाडे यांचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सांगत कुलकर्णी म्हणाले, जात, धर्म आणि पक्षीय विचारांच्या पलीकडे जाऊन समाजात समन्वय निर्माण करणारी पत्रकारिता त्यांनी केली. त्यामुळे महासत्ता हे वृत्तपत्र सामाजिक घटकांचे विश्वासार्ह व्यासपीठ बनले.

यावेळी प्रा. किसनराव कुऱ्हाडे यांनी वसंतराव दत्तवाडे यांचे विस्तृत चरित्र शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातून प्रकाशित करावे, अशी मागणी केली. त्यांचे कार्य आणि विचार पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरतील, असे ते म्हणाले.



शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने स्वर्गीय संपादक वसंतराव दत्तवाडे यांची पत्रकारिता या विषयावर बोलताना प्रसाद कुलकर्णी, शेजारी डॉ. शिवाजी जाधव, एस. आर. माने, प्रा. किसनराव कुऱ्हाडे आदि.

कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी दयानंद लिपारे, प्रा. सुनील देसाई आणि प्रमोद खडगुते यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले, तर दैनिक महासत्ताचे कोल्हापूर प्रतिनिधी एस. आर. माने यांनी आभार मानले.

कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, प्रेस क्लबचे उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, दैनिक महासत्ताचे प्रतिनिधी पांडुरंग दळवी, राजाराम पाटील, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर, एनडीटीव्हीचे प्रतिनिधी विशाल पुजारी यांच्यासह विद्यार्थी, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२ 8 JUL 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### युवक युवतींना नोकरीची संधी व कौशल्य वृध्दिंगत करणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

* योग शिक्षक - शैक्षणिक पात्रता : १० वी पास ( नऊ महिने) शैक्षणिक शुल्क रु.५,०००/-

### सहा महिने कालावधीचे अभ्यासक्रम

* बालवाडी शिक्षक शिक्षण - शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु.१,०००/-, पुस्तक / साहित्य शुल्क रु. १७५/-

### चार महिने कालावधीचा अभ्यासक्रम

* रोपवाटिका व उद्यान कौशल्य - शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु.१,०००/-

### तीन महिने कालावधीचे अभ्यासक्रम

* व्यक्तिमत्त्व विकास - शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* इव्हेंट मॅनेजमेंट- शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* औषधी वनस्पतींची ओळख, शैक्षणिक पात्रता : ७ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/-
* सूत्रसंचालन व निवेदन - शैक्षणिक पात्रता : १२ वी पास (४५ दिवस) शैक्षणिक शुल्क रु. २,०००/-
* मोडी लिपी - शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/- (१ महिना)

टीप : १. वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क रु. २५/- व माजी विद्यार्थी शुल्क रु. २५/- भरावे लागतील.
२. वरील अभ्यासक्रमांची माहितीपुस्तिका (Syllabus) शिवाजी विद्यापीठ सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स (अनेक्स बिल्डिंग) येथे विक्रीस उपलब्ध आहे.

### प्रवेशाची अंतिम तारीखः दि. १०/०८/२०२६

संपर्क : प्रा. डॉ. आर. जी. पवार,
संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार
विभाग दूरध्वनी : ०२३१-२६०९१५०/२६०९१५१

दिनांक : २८/०७/२०२६
ठिकाण : कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे,
कुलसचिव

28 JUL 2026
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### युवक युवतींना नोकरीची संधी व कौशल्य वृध्दिंगत करणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

* योग शिक्षक –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (नऊ महिने) शैक्षणिक शुल्क रु. ५,०००/-

### सहा महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* बालवाडी शिक्षक शिक्षण–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-, पुस्तक/साहित्य शुल्क रु. १७५/-

### चार महीने कालावधीचा अभ्यासक्रम

* रोपवाटीका व उद्यान कौशल्य–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-

### तीन महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* व्यक्तिमत्व विकास–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* इव्हेंट मॅनेजमेंट–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* औषधी वनस्पतींची ओळख, शैक्षणिक पात्रता: ७ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/-
* सुत्रसंचालन व निवेदन– शैक्षणिक पात्रता:१२ वी पास (४५ दिवस) शैक्षणिक शुल्क रु. २,०००/-
* मोडी लिपी, शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/- (१ महिना)

टिप : १. वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क रु. २५/- व माजी विद्यार्थी शुल्क रु. २५/- भरावे लागतील.

२. वरील अभ्यासक्रमांची माहिती पुस्तिका (Syllabus) शिवाजी विद्यापीठ सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स (अनेक्स बिल्डिंग) येथे विक्रीस उपलब्ध आहे.

### प्रवेशाची अंतिम तारीख: दि. १०/०८/२०२६

संपर्क : प्रा. डॉ. आर. जी. पवार,
संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
दुरध्वनी : ०२३१-२६०९१५० / २६०९१५१

दिनांक : २८/०७/२०२६
ठिकाण : कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे,
कुलसचिव